* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

## स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम यांनी केलेल्या कार्यवाहीतील दरोडयाच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांना दोन दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर नमुद गुन्हेगारांकडुन आणखीन गुन्हे केल्याची कबुली

जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हेगांरांवर प्रतिबंध करण्याच्या उददेशाने वेळोवेळी विशेष मोहीम राबवुन गुन्हयांवर अंकुश निर्माण केला आहे. दिनांक २५/०५/२०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक दिनकर गोरे यांना गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या माहीती वरुन, ग्राम डोंगरकिंन्ही शिवारातुन स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील अधिकारी कर्मचारी यांचे दोन वेगवेगळे पथक तयार करुन डोंगरकिन्ही येथील उमेश देशमुख यांचे शेताजवळुन सापळा रचुन दोन मोटारसायकली सह आरोपी १. लक्ष्मण मधुकर चव्हाण २. सज्जन मधुकर चव्हाण ३. कन्हैया मधुकर चव्हाण सर्व रा. पांगरखेडा ४. राजु किरीम पवार, ५. रामेश्वर किरीम पवार दो.रा. जानेफळ जि.बुलढाणा यांना अटक केली त्यांचे कडुन एका काळयारंगाचे बॅग मधुन एक फरशी कु-हाड, काळया रंगाची मुठ असलेली कटर कैची, पेंचीस, लोखंड कापण्याचे करवत, एक लहान पकड, मोठा पेचकस, एक लहान गॅस सिलेंडर नोजलसह, मिरची पावडर पाउच, रस्सी व धारदार स्टील पात्याचा सुरा असा १५४०/- रु. चा मुददेमाल, नगदी १२०/- रु व दोन मोटार सायकल किमंत १४००००/- रु. असा एकुण १४१६६०/- रु. चा मुददेमाल दरोडा घालण्याकरीता उपयोगात येणारे मददेमाल मिळुन आल्याने ते त्यांचे जवळुन जप्त करुन पोलीस उप निरीक्षक, दिनकर गोरे यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे. मालेगाव येथे अप.क्र. १७४/ २०१९ कलम ३९९, ४०२ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात अटक केलेल्या वरील पाचही आरोपींना वि.जेएमएफसी कोर्ट मालेगांव येथे पेश केले असता वि.न्यायालयाने त्यांचा दोन दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे. नमुद आरोपींना पोलीस कस्टडी रिमांड मध्ये असतांना सखोल विचारपुस केली असता त्यांनी बुलढाणा जिल्हयातील जानेफळ व हिंगोली जिल्हयात दरोडयाचे गुन्हे केल्याची कबुली दिली त्यावरून खात्री केली असता नमुद आरोपीविरूध्द पो.स्टे.जानेफळ येथे अप.नं. १९/१९ कलम ३९५, ४२० भादंवि व पो.स्टे. हिंगोली ग्रामीण येथे अप.नं.२४७/१८ कलम ३९५ भादंवि प्रमाणे गुन्हे दाखल असुन वरील दोन्ही गुन्हयात नमुद आरोपी हे अद्याप फरार असल्याचे माहीती मिळुन आली.

नमुद गुन्हेगार हे रेकॉर्ड वरील सराईत व क्रियाशिल गुन्हेगार असुन त्यांचेकडुन जिल्हयातील व लगतच्या जिल्हयातुन इतर बरेच मालमत्तेचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी व अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे व त्यांचे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि पो.स्टे. मालेगाव येथील पथक अधिक तपास करीत आहेत. यापुढे ही मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्याकरीता मा.पोलीस अधिक्षक साहेब व अपर पोलीस अधिक्षक साहेब यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी आवश्यक त्या उपाय योजना करुन मोहीम राबविण्यात येणार आहे.

Sthakare

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम